# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 03/10/2021 (रविवार)
(सायंकाळ)

---

**जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक**
**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीणचे पथकाची कार्यवाही**

दिनांक 02/10/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पो.स्टे. मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा कडुन त्यांना माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तात्काळ माथनी टोल नाका येथे जावून नाकाबंदी केली. दिनांक 02/10/2021 चे 05.00 वा. ते 06.00 वा. सुमारास एम. एच.– 40/ एके – 6683 क्रमांकाच्या महेन्द्र झेनान पिकअप गाडीला थांबवून वाहनाची पाहणी केली असता एम. एच.– 40/ एके – 6683 क्रमांकाच्या महेन्द्र झेनान पिकअप गाडी मध्ये एकुण 13 (गोरे,बैल) कि. 1,22,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी क्र. 1) आकाश उर्फ राकेश राजे कूंभलकर वय 22 वर्श, 2) आकाश लक्ष्मण सोनटक्के वय 25 वर्ष दोन्ही रा. लाखनी ता.जि.भंडारा व 3) समिर नावाचा इसम यांच्या ताब्यातुन 13 गोवंश व वाहनासह एकुण किंमती 5,72,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सपोनि श्री अनिल राउत, स्थानिक गुन्हे शाखा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 109 भादवी, सहकलम 11(1)11(1)सी11(1)(डी)11(1)(जे) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(ऐ)(1) 5(2) 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. 1 व 2 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कुथे मो.क्र. 9764007720 हे करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री अनिल राउत, पोहवा विनोद काळे, पोहवा ज्ञानेश्वर राऊत, नापोशि अरविंद भगत, नापोशि शैलेश यादव, पोशि प्रणय बनाफर, पोशि विरेंद्र नरड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर